(१)

## - पत्र -

अधून मधून आठवणीतल्या कविता वाचायला मला आवडतात. त्या जरी जुन्या असल्या तरी अजून ताज्याच वाटतात. आम्ही शालेय जीवनात त्यांना चाली लावून म्हणत असू त्याची मजा वेगळीच होती. तर कविता वाचताना 'पत्र' ही इंदिरा संत लिखित कविता वाचली.
कविता निर्विवाद छानच आहे. पण मला त्यावरुन तो काळ आठवला जेव्हां आपण रोज पोस्टमन द्वारे येणाऱ्या पत्रांची आतुरतेने वाट पाहात होतो.

पोस्टमनची यायची वेळ झाली की त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसत होतो. त्यावेळी असं वाटायचं की रोज एक तरी पत्र यायलाच हवं. कधी दादाचं कधी ताईचं किंवा अधून मधून आजी आजोबा, मामा, मावशी, आत्या, काका कोणी ही का असेना पण पत्र यायलाच हवं.

जरा मोठं झाल्यावर समजलं पत्रांचे प्रकार तरी किती? खुशालीचं, ऑफिशियल, कसली तरी नोटीस ची पत्र. कधीतरी नोकरीच call letter. अनेक प्रकार. मग शाळेत पत्रांचे वेगवेगळे मायने शिकलो.

असं हे पत्र आनंद वार्ता घेऊन यायचं तेव्हां त्याची घरात कितीतरी पारायणं होत असत. कधी दुःखद वार्ता यायची तेव्हां मन विषण्ण व्हायचं.

मुलगी सासरी गेली की तिच्या खुशालीच्या पत्राची सर्व घरदार वाट पाहात असे. मग ते ताईचं पत्र वाचताना वडीलांच्या चेहऱ्यावर आनंदाची रेषा आईच्या ओठांवर हसू आणि डोळ्यांत अश्रू (आनंद) दिसले की आम्हाला समजायचे कांहीतरी गोड बातमी आहे.

पत्र मग ते कुठलंही असो. पोस्टमन दिसला की प्रत्येकजण आशाळभूतपणे लावून येणाऱ्या

(2)

पोस्टमनचे स्वागत करत असे. जर का त्याने अपेक्षित पत्र दिले नाही तर पदरी घोर निराशा. कधी कधी पोस्टमनचा खूप राग यायचा. सगळ्यांची पत्र आणतो आमचं का नाही? पण तेव्हां हे समजत नसे की आपल्याला कोणी पत्रच लिहीलं नाही तर तो कसं आणणार? अक्षरशः वेड मन.

पत्र लिहीताना मन तर इतकं वाहावत जायचं की ते पुन्हा एकदा शालेय जीवनाची सैर करून यायचं मैत्रिणींच्या भेटी पण व्हायच्या. इतकं बोलकं पत्र असायचं. कधीतरी मन जगभर फिरून यायचं. कुठल्यातरी प्रवासाचं वर्णन करताना परत एकदा फिरून आल्याचा आनंद मिळायचा. असं हे वेड मन!

आता मन बदललं. कोणीही त्या पोस्टमनची वाट पाहात नाही. येवढंच काय पण त्याच्या येण्याच्या वेळाही कोणाला माहीत नसतात.

संगणक युगात भराभर मेल जातात. क्षणात वार्ता जगभरात पोचते मग आता त्या पोस्टमनची काय पत्रास. हजारो मैल लांब असणाऱ्या आपल्या माणसांशी आपण क्षणात बोलू शकतो तर video call वर आपण त्यांची घर त्यांना पाहू शकतो. येवढी अवाढव्य दुनिया आता जवळ आली आहे.

परीक्षा सुध्दा आता online होताहेत. लिहीण्याचं कांही कामच नाही. आपण इथे बसून चंद्रावर गेलेलं यान पाहू शकतो. अवकाशात सूर्यावर यान गेले आहे. हे सगळं Technology मुळे शक्य झालं.

तरीसुध्दा Book-Post आणि speed-Post ने येणारी पत्र घ्यायला Post man येतोच बरं का! कांही म्हणा पण पत्र लिहीणं मग त्याच्या उत्तराची आतुरतेने वाट पाहाणं. आर लवकर

(3)

Page No
Date
YOUVA

न आल्याने मनाला वाटणारी हुरहुर आणि मग उशीराने का होईना पत्र आनंदवार्ता घेऊन आलं आनंदानं नाचणारं मन आणि तो आनंद कांही आगळा वेगळाच होता.


आशा पावगी
"आनंदवन-B-10
वृंदावन-कॉम्प्लेक्स.
कोथरुड.







